<u>राज्य योजना सन २०२६-२७</u>
वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६ २२३२) अंतर्गत चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग,
शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी- ०५.२६/प्र.क्र.१९१/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- १२.०८.२०२६.

<u>वाचा :-</u>

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/१५६/२०२६-२७, दि. १५.०५.२०२६.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/१९८/२०२६-२७, दि. २७.०५.२०२६.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/२४१/२०२६-२७, दि. ०८.०६.२०२६.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/२५८/२०२६-२७, दि. ११.०६.२०२६.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/३३६/२०२६-२७, दि. २९.०६.२०२६.
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/४४०/२०२६-२७, दि. १३.०७.२०२६.
९. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/४७९/२०२६-२७, दि. २२.०७.२०२६.
१०.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/५१४/२०२६-२७, दि. २८.०७.२०२६.
११.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/५२०/२०२६-२७, दि. २८.०७.२०२६.
१२.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/५४७/२०२६-२७, दि. ३०.०७.२०२६.
१३.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/५६०/२०२६-२७, दि. ३१.०५.२०२५.
१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :-कक्ष-/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र. ५२/५८५/२०२६-२७, दि. ०७.०८.२०२५.

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ आर्थिक वर्षाकरिता वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६ २२३२) या लेखाशिर्षाअंतर्गत एकूण रु. १५२६०.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १ व २ चे परिपत्रकान्वये महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०२६ ला अनुसरुन सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात निधी वितरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. संदर्भ क्रमांक ३ ते १४ च्या पत्रान्वये सन २०२६-२७ करीता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६ २२३२) या योजनेतंर्गत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केले आहेत. त्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासननिर्णय :-

वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक १ व २ चे परिपत्रक विचारात घेता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ३ ते १४ च्या पत्रान्वये केलेली निधीची मागणी लक्षात घेऊन वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६ २२३२) या लेखाशिर्षांतर्गत सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार **रु. ३९६८.९० लक्ष** इतका निधी खालील अटी व शर्तीचे अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:

अ) सदर योजनेवर होणारा खर्च सन २०२६-२७ मध्ये लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव, पंचवार्षिक योजनाअंतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना (००) (१०) वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६ २२३२) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

आ) संदर्भ क्रमांक ३ ते १३ च्या पत्रामध्ये नमूद कार्यबाबींचा सदर योजनेमध्ये समावेश होत असल्याची खातरजमा करुन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निधी वितरीत करावा.

इ) योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

ई) शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावातील कार्यबाबींवर वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६ २२३२) या योजने व्यतिरीक्त इतर योजनेमधून निधी खर्च होणार नाही याची कृपया दक्षता घ्यावी.

उ) सदर कामे करताना भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ व वन (संवर्धन) अधिनियम, १९८० तसेच राष्ट्रीय प्राणी संग्रहायलयाच्या मार्गदर्शक तत्वांचा भंग होणार नाही व आवश्यक ती परवानगी घेतली गेली आहे ह्याची दक्षता घ्यावी.

ऊ) प्रस्तावात नमूद ज्या कामांना सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे त्यावरच वितरीत अनुदान खर्च होईल याची खातरजमा करण्यात यावी.

ऋ) वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेत विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

ऌ) प्रस्तावित असलेल्या बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.

ऍ) कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

ऎ) सदर योजनेच्या अनुषंगाने विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वे व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

ए) वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९. ०४.२०२६ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७. ०५.२०२६ चे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्रमांक :- ५५४/२०२६/ व्यय-१०, दिनांक १०.०७.२०२६ अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१२११२२२९०४४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIDHAR VIKRAM DESHMUKH

Digitally signed by SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=D3DD41251A6E229D40D43D90520B8D2A921AE59C80136446 28B65C38D28868D8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=912CC46938BC6D9CF9A14E38D8B09ED7F8FD6E5EE2A4 A245C1C55A32E6315D48, cn=SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
Date: 2026.08.12 11:23:23 +05'30'

(श्रीधर देशमुख)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अ.प्र.मु.व.स.(वन्यजीव),पश्चिम मुंबई / पूर्व नागपूर.
५. क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प (सर्व)
६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव),/वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव)/ उप वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) (सर्व)
७. विभागीय वन अधिकारी (वन्यजीव/प्रादेशिक) (सर्व).
८. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
९. ब-१,फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी- ०५.२६५/प्र.क्र.१९१/फ-१,

दिनांक : १२ ऑगस्ट, २०२६ सोबतचे विवरणपत्र.

(रु. लाखात)

अ. क्र.	वन विभाग	प्रस्तावाची रक्कम	वितरीत निधी			
			०२- मजुरी	२१- पुरवठा व सामग्री	२७- लहान बांधकामे	एकूण
१	उप वनसंरक्षक (प्रा.) सिरोंचा	१६०.४३	१.२४	८०.००	२०.००	१०१.२४
२	उप वनसंरक्षक (प्रा.) सांगली	२.००	०.३०	१.३०	०.४०	२.००
३	उप वनसंरक्षक (प्रा.) सोलापूर	६६४.८१	९९.७२	१५०.००	५०.००	२९९.७२
४	उप वनसंरक्षक (प्रा.) नागपूर	३७९.२०	०.००	२००.००	०.००	२००.००
५	वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, तडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर	९००.००	१३५.००	२००.००	२०.००	३५५.००
६	उप वनसंरक्षक (प्रा.) सातारा	५००.८४	७५.१२	१००.००	५०.००	२२५.१२
७	उप वनसंरक्षक (प्रा.) सावंतवाडी	१८८.१०	२८.२२	१००.००	०.००	१२८.२२
८	उप वनसंरक्षक (प्रा.) सातारा	२९९.६४	४४.९५	०.००	०.००	४४.९५
९	उप वनसंरक्षक, आलापल्ली	८.५२	१.२८	५.५४	१.७०	८.५२
१०	उप वनसंरक्षक (प्रा.) भंडारा	५७७.१७	५०.००	१००.००	५०.००	२००.००
११	उप वनसंरक्षक (प्रा.) वर्धा	२१७.६१	३२.६४	६०.००	२०.००	११२.६४
१२	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), जुन्नर	२३९.३२	३५.९०	३५.००	३०.००	१००.९०
१३	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे	३९९.०७	६२.२६	१००.००	०.००	१६२.२६

१४	विभागीय वन अधिकारी, वन्यजीव विभाग, अकोला	३४७.९१	५२.१९	८०.००	५०.००	१८२.१९
१५	उप संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर	१३५०.७७	६०.००	९०.५०	५०.००	२००.५०
१६	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे	१८२८.४२	११५.३२	५०.००	५०.००	२१५.३२
१७	पांढरकवडा वन्यजीव विभाग	३८२.२३	५७.३३	११३.२४	०.००	१७०.५७
१८	उप वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे	७७.१९	११.२८	४८.८७	१५.०४	७५.१९
१९	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), शहापूर	८८१.१९	९०.००	४०.००	१.८१	१३१.८१
२०	उप वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक	८४५.९७	१२६.९०	१००.००	२१.६५	२४८.५५
२१	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), डहाणू	९९७.३५	९९.६०	१५०.००	५०.००	२९९.६०
२२	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), जळगाव	१०९७.३०	१६४.६०	१००.००	५०.००	३१४.६०
२३	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), बुलढाणा	५१२.०९	३०.००	८०.००	८०.००	१९०.००
	एकूण	१२८५७.१३	१३७३.८५	१९८४.४५	६१०.६०	३९६८.९०

******